महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई-400 703.
M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai.

क्र.मुंविमं/IT ONLINE/३०४/३५५१
वाशी,नवी मुंबई-४००७०३
दिनांक: २७/०३/२०२२

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
मुंबई विभागीय मंडळाअंतर्गत येणारी सर्व कनिष्ठ महाविद्यालये.

विषयः आय. टी.(IT) विषयाची मंडळ मान्यता नसतांना विद्यार्थी प्रविष्ठ केल्याबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ मुंबई, वाशी, नवी मुंबई यांची माहिती तंत्रज्ञान विषय मान्यता/अतिरिक्त विद्यार्थीसाठी तुकडी मान्यता न घेता मार्च-एप्रिल २०२२ ची परीक्षेसाठीची माहिती तंत्रज्ञान विषयासह विनापरवानगी परीक्षा आवेदनपत्रे भरल्याचे निदर्शनास आले आहे. ही गंभीर बाब आहे. तथापि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी मंडळाने मान्यता नसलेल्या तुकडी/अतिरिक्त विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार विहित दंड शुल्क नियमानुसार निश्चित केले आहे. सदर शुल्क मंडळास अदा करणे आवश्यक आहे. याबाबत आपणास वेळोवेळी जाणीवही करून देण्यात आली आहे. परंतू याबाबत अजूनही काही कनिष्ठ महाविद्यालयांनी दखल घेतलेली दिसून येत नाही. त्यामुळे त्यांना माहिती तंत्रज्ञान विषयाचे ऑनलाईन परीक्षेसाठीचे सीडी/पासवर्ड मिळालेले नाहीत. तथापि विद्यार्थी हित व परीक्षेसाठीचा कमी कालावधी लक्षात घेता हमीपत्राच्या आधारे ऑनलाईन परीक्षेची सीडी/पासवर्ड देण्याचा निर्णय विभागीय मंडळाने घेतला आहे.

तरी संबंधीत कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या लेटरहेडवर हमीपत्र सादर करून वा विहित दंडशुल्क अदा करून **दि.२८/०३/२०२२** रोजी सायंकाळी ६.०० वा. पर्यंत सीडी/पासवर्ड ताब्यात घ्यावे. याबाबत कोणतीही हयगय वा दिरंगाई झाल्यास व त्यामुळे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

27/3/2022
(डॉ. सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
मुंबई विभागीय मंडळ

प्रत माहितीस्तव: राज्य मंडळ, पुणे.

Telephone : 27652445 , 27662504 , 27881075 , 27881077, 27899987 * Fax *: 27659491 / 27881349
*Email * : sscboard@vsnl.com * Website *: www.sscboardmumbai.in

# <u>हमीपत्र</u>

प्रति,

मा. विभागीय सचिव,

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक

विभागीय शिक्षण मंडळ मुंबई, वाशी, नवी मुंबई

मुख्याध्यापक/प्राचार्य------------------------------------------------------------ ---------------------- याजकडून हमीपत्र लिहून देण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ मुंबई, वाशी, नवी मुंबई यांची माहिती तंत्रज्ञान विषय मान्यता/अतिरिक्त विद्यार्थी तुकडी मान्यता नसतांना आमच्या कनिष्ठ महाविद्यालयाने मार्च-एप्रिल २०२२ ची परीक्षा आवेदनपत्रे विनापरवानगी सादर केलेली आहेत. त्यासाठीचे विहित दंड शुल्कही मंडळास अदा केलेले नाही. त्यामुळे आमच्या कनिष्ठ महाविद्यालयाला अद्यापपावेतो माहिती तंत्रज्ञान विषयाच्या ऑनलाईन परीक्षेसाठीची सी.डी./ पासवर्ड मिळालेले नाही.

परंतू वरील प्रक्रिया परीक्षा निकालापूर्वी पूर्ण करू अशी मी हमी देत आहे. त्या अभावी निकाल राखीव राहिल्यास किंवा रद्द झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आमच्या कनिष्ठ महाविद्यालयाची राहील, तसेच विभागीय मंडळ नियमानुसार जो निर्णय घेईल तो आम्हास बंधनकारक राहील.

स्थळ-

दिनांक-

मुख्याध्यापक/प्राचार्य

सही व शिक्का